- अर्ज -

प्रति.
मा. संस्थाचालक साहेब.
माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी, औरंगाबाद.
दि. 05/02/2023

सहारा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर, एफ-15040 दि. 17/03/2010
ई-टपाल क्र- सा.शि.प्र.मं./ 03

विषय - मला शाळेत होत असलेल्या मानसिक त्रासाविषयी आपणास सर्व बाबी माहित होण्याबाबत.

अर्जदार :- श्रीम. शीला मुरलीधर पाटील.
सहशिक्षिका, माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी, औरंगाबाद.

महोदय,

मी आपल्या संस्थेत सन 2008 पासुन सहशिक्षिका म्हणून कार्यरत आहे. मी सध्या आपणाकडे 40% अनुदानावर संस्थेत कार्यरत आहे. माझे पति श्री. चंद्रकांत हिरामण सोनवणे हे सन 2011 साली वारले आहेत. आपल्या शाळेत सध्या कार्यरत असलेल्या काही शिक्षक व शिक्षिकांमुळे मला मानसिक त्रास जाणवतो आहे. त्यातील काही शिक्षक व शिक्षिकांचे माझ्या विषयी बदनामी कारक वक्तव्य केले आहेत. त्यांच्यातील काही शिक्षकांचे चुकीचे बदनामी-कारक व माझ्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याच्या दृष्टीकोनातून आलेल्या वक्तव्याबाबत आपणास सर्व बाबी/सर्व गोष्टी माहित व्हाव्यात यासाठी मी अर्ज लिहीत आहे.

1) सर्व प्रथम श्री. किशोर लंबे सर यांनी मला व श्री. राकेश गांगुर्डे सरांना पिक्चर टॉकीज मध्ये दोघांना बघीतले. असे श्रीम. धनश्री पाटील मॅडम या सर्वांना सांगत आहेत. जे कधी घडलेच नाही.

2) श्री. बनारसे सर हे मुख्याध्यापक असताना त्यांचे व माझे प्रेम प्रकरण चालू होते व आम्ही दोघे मुख्याध्यापक कॅबीनमध्ये बोलत असायचो, आणि कुणी येते की काय? हे पाहण्यासाठी कॅबीनच्या बाहेर श्रीम. केंद्रे मॅडम पहारेकरी म्हणून उभ्या असायच्या. असे श्रीम धनश्री मॅडम या श्रीम. केंद्रे मॅडम यांना म्हणतात. हे मला स्वत: केंद्रे मॅडम यांनी सांगितले. जे कधीही घडलेले नाही. कारण की मी मुख्याध्यापक कॅबीनमध्ये जाताना देशम श्रीम. पाटील मॅडम किंवा श्रीम. देशमुख मॅडम यांना सोबत

घेऊनच जात होते.

3) श्रीम. धनश्री पाटील मॅडम या सर्वांसमोरही व माझ्यासमोर सुद्धा असे म्हटल्या की, श्री. वनारसे सर यांचे सोनवणे मॅडम ~~सम~~ सोबत काहीतरी संबंध आहेत म्हणून श्री. वनारसे सर हे सोनवणे मॅडमचे ~~खु~~ खुप कौतुक करतात. व त्यांना चुक झाली तरी सांभाळून घेतात. परंतु प्रत्यक्ष तसे काही नव्हते. फक्त माझ्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्यासाठी श्रीम. धनश्री पाटील मॅडम माझी अशाप्रकारे बदनामी करत होत्या.

4) श्री. वनारसे सर व माझ्या दरम्यान लफडे झाले होते म्हणून साहेबांनी मला मुंबईला बदली करून व श्री. वनारसे सरांची वाळूज येथे बदली करून दिली. असे शाळेतील जवळपास सर्व शिक्षक-शिक्षिकांनी माझी बदनामी केली. आणि ही बातमी फक्त शाळेतच नव्हे तर सर्व संस्था, नातेवाईक, गावाकडे व संपुर्ण तालुका-जील्ह्यात ~~पसली~~ पसरली होती. परंतू खरे पाहता असे आहे की, मुंबईच्या शाळेवर बदली मागण्यासाठी मी स्वत: आपल्याकडे वडीलांसोबत आले होते. कारण माझ्या मुलीच्या शिक्षणासाठी मला पुणे विद्यापिठातून प्रवेश हवा होता.

5) श्रीम. शर्मा मॅडम असे म्हणतात की, श्रीम. पाटील सविता मॅडम यांना मुख्याध्यापक पद हवे असल्याने श्री. गांगुर्डे व श्रीम. सविता पाटील या दोघांना श्री. वनारसे यांची हकालपट्टी करायची होती परंतू या प्रकारात बळी सोनवणे मॅडम पडल्या. व त्यांना मुंबईच्या शाळेवर जावे लागले. परंतु प्रत्यक्षात वरील गोष्ट मला माहित नव्हती. मलाच मुंबई बदली माझ्या वयक्तिक कारणामुळे हवी होती.

6) तसेच, मला या महिण्याभरात शाळेतील जवळपास सर्वच शिक्षक-शिक्षिकांनी असे सांगितले की, मॅडम तुम्ही मुंबई बदली करून गेल्यावर तुमच्या मागे येथे खुपच घाणेरडे आरोप लावण्यात आले. व हेतूपुरस्कर बदनामी करण्यात आली.

7) त्याचबरोबर श्रीम. वेळाव मॅडम यांनीही माझ्याविषयी मी मी मुंबईला असताना खुपच घाण वक्तव्य केलेले आहे. ते वक्तव्य कोणते होते, ते आम्ही तीघी - श्रीम. शर्मा मॅडम, श्रीम. पवार मॅडम, श्रीम. अंबिलवादे मॅडम. साहेबांसमोर प्रत्यक्ष सांगु. असे

श्रीम. शर्मा मॅडम यांनी मला स्वतः ला स्टाफरूम मध्ये सर्वासमोर 23/01/23 रोजी सांगीतले.

8) तसेच, कोण काय-काय बोलले आहे हे वैभव मॅडम आपल्यासमोर सांगण्यास तयार आहेत. कारण त्यांनाही त्रास झाला आहे व होत आहे. असे त्या स्वतः दि. 3/02/23 रोजी माझ्या घरी येऊन म्हणाल्या.

9) इतरांबरोबर श्रीम. देशमुख मॅडम सुद्धा तुमच्याकडे असे बोललेल्या आहेत की सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात 10 वी चे दोन्ही वर्ग त्यांनी एकट्याने सांभाळलेले आहेत. असे असताना मग मला प्रश्न पडला की, मी काय करत होते मग वर्षभर ? जर वर्ग त्यांनी सांभाळला तर! या गोष्टीचा खुला मुद्दे सरांनी माझ्याजवळ केलेला आहे. परंतू ते समोर येऊ स्पष्ट सांगतील याची मला खात्री वाटत नाही. परंतू आज आपण माहीत आहे की श्रीम. देशमुख मॅडम यांनी काय वक्तव्य केलेले आहे.

10) या सर्व बाबतीत मला मुंबईहून आल्यापासून व हे सर्व समजल्या पासून खूप मानसिक त्रास होत आहे. माझ्या पाठीमागे इतर शिक्षक-शिक्षिकांसारखे खंबीरपणे उभे राहण्यास कुणीही नाही. म्हणून मी या वरील सर्व बाबतीत शांत बसून गिळण्याचा प्रयत्न केला व उगाच आपल्या शाळेची व शिक्षकांची न घडलेल्या गोष्टींची बदनामी नको व ही वरीष्ठ जुनी बाब. झाली म्हणून मी त्या गोष्टी उकरून न काढता प्रामाणिकपणे शालेय कामकाज करून वरील न घडलेल्या वाईट गोष्टी दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला करत होती. परंतु मागील आठवड्यात माझ्या समक्ष श्रीम. शर्मा मॅडम यांनी वारंवार माझे नाव घेऊन त्यांच्या भांडणात मला ओढण्याचा प्रयत्न केला. त्या प्रत्यक्ष अशा बोलल्या की, ① सोनवणे मॅडम ऐवढी बदनामी होऊनही शांत बसल्या कारण त्यांचे तसे काही प्रकरण असेल म्हणून. "ज्याचे असते ना तोच शांत बसतो. माझे नाही काही प्रकरण तर मी शांत बसणार नाही."

मी बघा आता धिंगाणाच करते. असे शर्मा मॅडम श्रीम. देशमुख मॅडम व श्री. किशोर लंबे सरांना बोलत होत्या.(दि. 4/2/23)

म्हणून मला आज आपणाकडे लिखित स्वरूपाची तक्रार दयावी लागत आहे. मी आपणाकडून माझ्यावर झालेल्या अन्यायाला न्याय मिळेल या अपेक्षेने सदर अर्ज आपणास विनंतीपूर्वक देत आहे. मी सदर प्रकारचा अर्ज पोलिस स्टेशनला देणार होते, परंतू आपण आदरणीय असल्याने व ~~प्रथम~~ संस्थाचालक या नात्याने प्रथम आपल्या कानावर ही गोष्ट टाकने आवश्यक वाटले. सदर अर्ज आपणास विनंतीपूर्वक व माझ्या वरिल अन्यायाला न्याय मिळविण्यासाठी देत आहे. त्याचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार करावा ही नम्र विनंती.

गेल्या एक महिन्यापासून या वरिल सर्व गोष्टी मला माहित झाल्या आहेत. तेव्हापासून माझे मानसिक संतुलन ढासळू लागले आहे. जर माझे उद्या काही कमी-जास्त घडले तर त्या बाबतीत अर्जात नमुद केलेल्या शिक्षक-शिक्षिकांना जबाबदार धरावे ही विनंती. सर्व खोटे आरोप लावून एका विधवा स्त्रीला त्रास देण्याचा हा प्रकार चालू आहे. मी या बाबतीत कायदेशीर सुध्दा तक्रार करु शकते. कारण तसे पुरावे माझ्याकडे आहेत परंतू आपण आदरणीय असल्याने पहिल्यांदा आपणास सांगणे योग्य वाटले.
मी सदर अर्जाची झेरॉक्स माझ्याकडे काढून ठेवली आहे. कारण संबंधीत काही शिक्षक हा अर्ज आपल्यापर्यंत पोहचू देतील की नाही, अशी मला शंका वाटते.

वरील सर्व बाबतीत मी प्रत्यक्ष आपल्यासमोर व सर्वांसमोर शहानिशा/खरेखोटे करण्यास तयार आहे. कारण काहीही वाईट काम मी केलेले नसूनही माझ्यावर घाणेरडे आरोप केले गेलेले आहेत. म्हणून मला एक प्रकारे मानसिक टॉर्चर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

कृपया वरिल सर्व बाबतीत गांभिर्यपूर्वक विचार करुन मला न्याय दयावा ही विनंती.

आदरणीय साहेबांना सविनय सादर...

(सही)

आपली कृपाभिलाषी

श्रीम - शीला मुरलीधर पाटील (सोनवणे)

- सहशिक्षिका

- माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी औरंगाबाद.